# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी
# कल्याण उपविभाग कल्याण यांचे कार्यालय

पत्ता: मोहन प्राईड सांस्कृतिक कल्याण केंद्र, दुसरा मजला पोद्दार इंटरनॅशनल स्कूल जवळ, खडकपाडा,
कल्याण (प.)-४२१३०१ दुरध्वनी क्र. ०२५१-२२०११८ ई-मेल : kalyansdo@gmail.com

क्र./टे-१५-भूसंपादन/कावि- ०३/२६ दिनांक : ०२/०३/२०२६

प्रति,

मा. जिल्हाधिकारी ठाणे
(भूसंपादन शाखा)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
आवक क्र 1637
दिनांक 13/04/2026

**विषय :** अधिसूचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत...

**संदर्भ :** या कार्यालयाची अधिसूचना क्रमांक: टे-१५-भूसंपादन/कावि- ०३/२६
दि. ०२/०३/२०२६.

उपरोक्त संदर्भिय अधिसूचनेची मूळ प्रत सोबत जोडली असून त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत म.औ.वि.महामंडळाच्या मालकीच्या तळोजा एम.आय.डी.सी. ते बदलापूर अंबरनाथ काटई नाका रोड दरम्यानच्या रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेकामी जमीन संपादीत करावयाच्या प्रस्तावित मिळकतींबाबत भूसंपादन पुनवर्सन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अतंर्गत कार्यवाही सुरू आहे. उक्त अधिनियमातील कलम २५ मधील तरतुदीनुसार विषयांकीत प्रकरणी अधिसूचना प्रसिध्द करावयाची आहे. तरी सोबतची अधिसूचना आपल्या कार्यालयीन सूचना फलकावर, संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी विनंती आहे.

DMC (Land)
28/4

28/4
ALEXE (AC)

(विश्वास गुजर)
भू-संपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कल्याण

१. मा. उप सचिव, महसूल व वन विभाग (अ-४) , मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ४५२, मुंबई ३२
२/- सोबतची अधिसूचना शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

२. उप जिल्हाधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वांद्रे.
२/- सोबतची अधिसूचना आपल्या कार्यालयीन सूचना फलकावर, संकेतस्थळावर तसेच बाधित ठिकाणी प्रसिध्द करणेकामी आपल्या अधिनस्त संबंधित अधिकाऱ्यांना सुचित करणेकामी विनंती आहे.

३. तहसिलदार कल्याण.
२/- सोबतची अधिसूचना आपल्या कार्यालयीन सूचना फलकावर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास पाठवावा.

भूमि व मिळकत शाखा
आवक क्र. 2017
दिनांक 15-04-26

क्र.भा.५.

## भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम क्र. २५ खाली अधिसूचना

**क्रमांक : टे-१५-भूसंपादन/कावि- ०३/२६**

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ मध्ये नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देतील आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, भूमी संपादनाची संपूर्ण कार्यवाही व्यपगत होईल.

परंतु, समुचित सरकारला, त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे.

परंतु, आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

मौजे खोणी, ता. कल्याण, जि. ठाणे येथील भूसंपादन प्रकरणात प्रारुप/अंतिम निवाडयाची प्रक्रिया प्रशासकीय सौकार्याच्या दृष्टीने मंजुर करण्याकरिता अडचणी येत होत्या. त्यामुळे सदर अधिनियमाचे कलम २५ मधील तरतुदी विचारात घेता १२ महिन्यांच्या कालावधी पर्यंत समूचित शासन यांचे स्तरावरून मुदतवाढ घेणे आवश्यक होते. जर निवाड्यास मुदतवाढ न मिळाल्यास सदर प्रकरणात पुन्हा नव्याने कलम ११ (१) पासून सर्व प्रक्रिया करावी लागणार होती. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होऊन भूसंपादन प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता होती.

उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये समुचित शासन असलेले मा. जिल्हाधिकारी या नात्याने प्रकरणात १२ महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरुन खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्याच्या कालावधीत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ मंजुर केलेली असून सदर मुदतवाढीचे अनुषंगाने अधिसूचना निर्गमित करुन ती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले आहेत.

**अनुसुची - एक**
**संपादन करावयाच्या जमिनींचा तपशिल**
**मौजे:- खोणी, ता. कल्याण, जि. ठाणे**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक/ गट क्रमांक | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर.प्र.) |
|---|---|---|
| १ | ११४/१ पै | ०.१३३० |
| २ | ११४/३/अ | ०.००८० |
| ३ | १०४/१ | ०.००३५ |
| ४ | १०७/४/अ | ०.०१३५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | १४८/१७ | ०.०२५० |
| ६ | १४८/१६ | ०.०११० |
| ७ | १४८/१०/अ | ०.१६०५ |
| ८ | ७४/ब | ०.०३३० |
| ९ | ५५/१/अ | ०.०६३० |
| १० | ५५/९ | ०.०१६० |
| ११ | ३९/१/अ | ०.००७० |
| १२ | ३८/२/अ/२ | ०.०५५० |
| १३ | ३१/२/अ | ०.०६०५ |
| १४ | ३१/३ | ०.०५३० |
| १५ | पाडा | ०.०१९० |
| एकूण | | ०.६६१० |

## अनुसुची — दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत म.औ.वि.महामंडळाच्या मालकीच्या तळोजा एम.आय.डी.सी. ते बदलापूर अंबरनाथ काटई नाका रोड दरम्यानच्या रस्त्यांचे रूंदीकरण व मजबुतीकरण.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत म.औ.वि.महामंडळाच्या मालकीच्या तळोजा एम.आय.डी.सी. ते बदलापूर अंबरनाथ काटई नाका रोड दरम्यानच्या रस्त्यांचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणेकामी जमीन संपादनाबाबत मौजे खोणी येथील क्षेत्र ०.६६.१० हे.आर.प्र. क्षेत्र संपादित करणेत येत आहे.

**समाजाला मिळणारे लाभ** :- सार्वजनिक रस्त्यांचा वापरण्यासाठी होऊन प्रवाशी तसेच मालवाहतूक लाभ वृध्दींगत होईल.

## अनुसूची- तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

**मौजे- खोणी, तालुका- कल्याण, जिल्हा- ठाणे**

| अ.क्र | गावाचे नाव | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | बांधकामांची संख्या |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

अनुसूची- चार
(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

मौजे खोणी, ता. कल्याण, जि. ठाणे येथील एकूण क्षेत्र ०.६६.१० हे.आर.प्र. हे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत म.औ.वि.महामंडळाच्या मालकीच्या तळोजा एम.आय.डी.सी. ते बदलापूर अंबरनाथ काटई नाका रोड दरम्यानच्या रस्त्यांचे रूंदीकरण व मजबुतीकरण या प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी संपादन होत आहे. सदर प्रकल्पात कोणीही खातेदार विस्थापित होत नसल्याने पुनर्वसन व पुनर्स्थापना करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

दिनांक : ०२/०३/२०२६
ठिकाण : कल्याण

(विश्वास गुजर)
भू-संपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कल्याण